श्री शरद साहेबराव कवडे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-काष्टी, ता.श्रीगोंदा यांना ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन तात्पुरते दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्रमांक- साप्रवि-२/ग्रापं-३/५०८/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १.गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांचेकडीलपत्र क्र. आस्था-२/६२२/२०२६, दि.०२/११/२०२६.
२.सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीडीआर १०९९/प्र.क्र.६२/९९/११अ, मुंबई दिनांक ०३ एप्रिल,२०००.

संदर्भ क्र.१ अन्वये गटविकास अधिकारी पंचायत समिती श्रीगोंदा यांनी संदर्भीय पत्रानुसार श्री शरद साहेबराव कवडे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-काष्टी, ता.श्रीगोंदा यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली दिनांक ३०/१०/२०२६ रोजी गुन्हा दाखल करुन अटक केलेबाबत कळविले आहे.

प्रकरणी प्रथम खबर अहवालानुसार, तक्रारदार श्री ओंकार शिवाजी म्हस्के,रा.काष्टी यांचे वडील श्री शिवाजी बाबुराव म्हस्के यांनी श्री दगडु तुळशीराम डोमे,रा.काष्टी, ता.श्रीगोंदा यांच्याकडून मौजे काष्टी येथील सिटी सर्व्हे क्र.१८१ मधील बांधकाम व बखळ जागा ४०.३५ चौ.मी. क्षेत्र खरेदी केले असुन त्यांचे खरेदी खत दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा येथे नोंदविण्यात आले आहे. त्याचा दस्त क्र.३५९८/२०२६ असा आहे. तसेच दि.३०/०६/२०२६ ची सूची क्र.२ व नोटरी केलेले संमतीपत्राची छायांकित प्रत तक्रारदार यांचे वडील यांनी काष्टी ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी श्री शरद कवडे यांचेकडे जमा केली आहे. परंतु श्री कवडे यांनी सदरच्या दोन्ही नोंदी ग्रामपंचायतच्या दप्तरी घेतल्या नाहीत. दि.०५/१०/२०२६ रोजी तक्रारदार व त्यांचे वडील असे ग्रामपंचायत कार्यालयात जावुन श्री कवडे यांना भेटलो व त्यांनी तक्रारदार यांच्या दस्ताच्या व संमतीपत्राच्या नोंदी घेणेबाबत विचारणा केली असता श्री कवडे यांनी तक्रारदार यांच्या नोंदी खुप किचकट आहेत. त्या नोंदी घेण्यासाठी तक्रारदार १,२५,०००/- रुपये द्यावे लागतील, असे म्हणाले. तक्रारदार यांची लाच देण्यास इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपल प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर येथे दि.१४/१०/२०२६ रोजी तक्रार दिली. दिनांक १४/१०/२०२६ रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान १५/२१ ते १५/४५ वाजेच्या दरम्यान हॉटेल स्वाद,कोळगाव,ता.श्रीगोंदा येथे लोकसेवक कवडे यांनी तक्रारदार श्री म्हस्के यांचेकडे त्यांचे खरेदी दस्ताची व संमतीपत्राची नोंद ग्रामपंचायत दप्तरी घेणेकरीता १,२५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवुन गुन्हेगारी स्वरुपाचे वर्तन केले, म्हणुन यातील लोकसेवक श्री शरद साहेबराव कवडे, वय-५३, ग्रामपंचायत अधिकारी, वर्ग-३ ग्रामपंचायत काष्टी व कोळगाव,ता.श्रीगोंदा यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे कायदेशीर फिर्याद देऊन त्यांना दिनांक ३०/१०/२०२६ रोजी वेळ १४.०९ वाजता अटक करण्यात आलेली आहे व त्यांना दि.३१/१०/२०२६ रोजी मा.न्यायालयाने जामीनावर मुक्तता केली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३ नुसार पदावरुन तात्पूरते दुर करणे मधील पोटनियम (१) (ब) अन्वये कोणत्याही फौजदारी गुन्ह्याच्या संबंधित त्यांच्या विरुध्दच्या प्रकरणाचा बारीक तपास किंवा न्याय चौकशी करण्यात येत असेल त्याबाबतीत नियुक्ती प्राधिकरण कर्मचा-यास पदावरुन निलंबित करु शकेल.

उक्त नमुद केलेनुसार, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर यांनी कार्यवाही करुन दिनांक ३०/१०/२०२६ रोजी गुन्हा दाखल केल्यामुळे मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चा नियम ३ चे १ (ब) व संदर्भ क्र.२ च्या शासन

निर्णयामधील मुद्दा क्रमांक ०७ (ब) अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन श्री शरद साहेबराव कवडे, ग्रामपंचायत अधिकारी यांना दिनांक ३०/१०/२०२६ पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबीत करीत आहे.

पुढे असाही आदेश देत आहे की, निलंबन काळात श्री शरद साहेबराव कवडे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-काष्टी, ता.श्रीगोंदा यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहन अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन बड़तर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) नुसार मुळ वेतनाच्या ५० टक्के व त्यावर आधारीत महागाई भत्ता व इतर मिळणारे भत्ते जिल्हा परिषदेच्या सेवेतून सेवा निलंबित केल्यापासून मिळणेस पात्र राहील.

त्याप्रमाणे निलंबनाचे कालावधीत, श्री शरद साहेबराव कवडे, ग्रामपंचायत अधिकारी यांना खाजगी नोकरी, खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही. जर त्यांनी सेवा निलंबन काळात नोकरी, धंदा व इतर व्यवसाय केल्यास ती गैरवर्तणूक होऊन व त्या कारणासाठी ते शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील. तसेच श्री शरद साहेबराव कवडे,ग्रामपंचायत अधिकारी हे निर्वाह भत्ता मिळण्याचा हक्कही गमावतील. जो पर्यंत निलंबनाचा आदेश अस्तित्वात आहे. तो पर्यंत श्री शरद साहेबराव कवडे,ग्रामपंचायत अधिकारी मुख्यालय पंचायत समिती-पारनेर- येथे राहील. श्री शरद साहेबराव कवडे,ग्रामपंचायत अधिकारी यांना गटविकास अधिकारी पंचायत समिती-पारनेर- यांच्या पुर्व मंजूरी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही अथवा त्यांना गैरहजर राहता येणार नाही. जर गैरहजर राहीले तर ती कृती गैरवर्तणूक ठरेल आणि श्री शरद साहेबराव कवडे, ग्रामपंचायत अधिकारी हे शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहतील.

गटविकास अधिकारी पंचायत समिती ---पारनेर------ यांनी श्री शरद साहेबराव कवडे, ग्रामपंचायत अधिकारी यांना निर्वाह भत्ता देण्यापुर्वी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वियेत्तर सेवा निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६९ (१) अनुसार प्रत्येक महिन्यास प्रमाणपत्र घ्यावे.

या आदेशाची नोंद श्री शरद साहेबराव कवडे,ग्रामपंचायत अधिकारी, यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६११७०८६०१२४ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 17-11-2026 13:01:29
आनंद भंडारी (भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री शरद साहेबराव कवडे,ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत-काष्टी, ता.श्रीगोंदा जि.अहिल्यानगर
व्दारा व प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर

२/-सदर आदेश संबंधितांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.

प्रत :- गटविकास अधिकारी, पंचायत समिती ---पारनेर-------जि.अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी

प्रत :- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत :- ग्रामपंचायत, आस्थापना कार्यासन- ग्रापं-१, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना पुढील कार्यवाहीसाठी